# जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, मा. राज्यपाल महाराष्ट्र शासन यांचे नावे जलसंपदा विभागाचे प्राधिकृत प्रतिनिधी, कार्यकारी अभियंता बुलडाणा पाटबंधारे विभाग, बुलडाणा व उपविभागीय अधिकारी व्याघ्रा नाला कालवा उपविभाग मलकापूर राहेरा संग्राहक लघु पाटबंधारे योजना ता. मोताळा जि बुलडाणा योजनेच्या बुडीत क्षेत्रामुळे बाधीत राहेरा गावाचे पुनर्वसना करीता आवश्यक वाढीव जमिन सन २०१३ च्या भुसंपादन कायदया नुसार २६ ते ३० मुद्दे महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग "शासन निर्णय क्र. संकिर्ण ०३/ २०१५ /प्र.क्र.३४/अ–२ दि. १२.०५.२०१६ चे मार्गदर्शक तत्वे, महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण (०३) २०१५/प्र.क्र.३४/अ–२ दि. ३०.०८.२०१६ चे सुधारीत मार्गदर्शक तत्वे व महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्र. संकिर्ण एल.क्यु. ०१/२०१७/प्र.क्र.१२/अ–२ दि. २५.०१.२०१७ अन्वये विभागीय कार्यालय, बुलडाणा, उपविभागीय कार्यालय मलकापूर येथील खालील अनुसुचीमध्ये दर्शविल्या प्रमाणे जमिन धारकाची जमिन खाजगी वाटाघाटीने/ व्यवहाराने सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादीत/ सरळ खरेदी करण्याचे प्रस्तावित आहे.

खालील अनुसुचि मध्ये संबंधीत मालकाचे नाव, गट क्रमांक व संपादीत करावयाचे क्षेत्र इत्यादी तपशिल दिला आहे. सदर जमिनीचे मालकी हक्काबाबत हिश्याबाबत तसेच इतर हितसंबंध, दत्तकपुत्र, वारस, गहाण, दान, बोजा, बाकी, लिज, कर्ज, बक्षीस, बक्षीस, करार मदार व इतर असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन दहा दिवसाचे आत पुराव्यानिशी लेखी तक्रार कार्यालयीन वेळेत (सकाळी १० ते सायंकाळी ५पर्यंत) उपविभागीय अधिकारी, महसुल मलकापूर ता. मलकापूर जि. बुलडाणा या कार्यालयात समक्ष अथवा रजि. पोष्टाने कळवावे. तसेच नमुद केलेल्या पत्यावर सर्व कागदपत्रांसह समक्ष येवून भेटावे व आपले असलेले हितसंबंधाबाबत खात्री करुन घ्यावी. तसे न केल्यास कोणाचेही काही एक म्हणणे अगर हरकत नाही तसेच सदर मिळकतीवर कोणाचाही काहीही व कोणत्याही प्रकारचा हितसंबंध नाही असे समजुन सदर मिळकतीच्या खरेदी खताचा व्यवहार पुर्ण करण्यात येईल व त्यानंतर कोणाचाही कोणताही उजर चालणार नाही याची नोंद घ्यावी.

ही खरेदीपुर्व नोटीस दिली.

दिनांक– १९/१०/२०१८

**अनुसुची–** राहेरा संग्राहक लघु पाटबंधारे योजना मौजे राहेरा ता. मोताळा जि. बुलडाणा मधील सरळ खरेदीद्वारे संपादन करावयाच्या जमिनीचा तपशिल.

| अ. क्र. | जमिन मालकाचे नाव | शिवार | गट क्रमांक | एकूण क्षेत्र हे.आर. | खरेदी/संपादन करावयाचे क्षेत्र हे. आर. |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | कमलबाई विक्रम जाधव | राहेरा | ४ | ०.१९ | ०.१९ |
| ०२ | दिपक पंजाबराव जाधव व इतर ७ | राहेरा | ३ | ०.२६ | ०.२६ |

उपविभागीय अधिकारी
व्याघ्रा नाला कालवा
उपविभाग मलकापूर

कार्यकारी अभियंता
पाटबंधारे विभाग, बुलडाणा उपविभाग

सदरील नोटीस आमचे माहितीवरून, विनंतीवरून, कागदपत्रावरून, अधिकारावरून प्रसिध्द केली आहे.

ॲड. श्री. एस. डब्ल्यू. बघे
ता. नांदुरा जि. बुल्डाणा